# परळी न.प.पाणी पुरवठा विभागात मुख्याधिकारी,गुत्तेदार,इंजिनिअरच्या संगनमताने कोट्यावधीचा भ्रष्टाचार

## वृत्त प्रकाशित होताच इंजिनिअर साळवे,गुत्तेदाराला आली कळ;म्हणून करू लागले वळवळ

# भ्रष्टाचार निघणार, तक्रारही होणार; गुत्तेदाराला पोसणारे अधिकारी बोगस बिलात अडकणार

बीड (सरकार): परळी नगर पालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून एकाच गुत्तेदाराला पोसण्याचे काम पाणी पुरवठा विभागाने केले आहे. मोटार दुरूस्ती, नवीन मोटार टाकणे यासह पाणी पुरवठ्यामध्ये कोट्यावधीचा भ्रष्टाचार झाला आहे. या भ्रष्टाचार प्रकरणी दैनिक सरकारने वृत्त प्रकाशीत करताच मुख्याधिकारी, इंजिनअर आणि गुत्तेदाराला चांगलीच कळ आली आहे. मात्र ही वळवळ लवकरच कमी होणार आणि भ्रष्टाचार निघणार, तक्रारही होणार, गुत्तेदाराला पोसणारे अधिकारी अडकणार असल्याचे बोलले जात आहे.



पाणी पुरवठा विभागातील इंजिनिअर साळवे हे जाणून बुजून गुत्तेदाराची बाजू धरत आहेत. गुत्तेदारांनी केलेले आरोप अनेकांना माझा काही संबंध नाही. वाटले तर विचारा असे बोलून रितसर भ्रमणध्वनीवर आले आहेत. त्यामुळे इंजिनिअर साळवेची स्वतंत्र तक्रार होणार असल्याचे बोलले जात असून परळी नगर पालिकेतील सगळ्यात मोठा भ्रष्टाचार पाणी पुरवठा विभागात झाल्याचा मोठा गाजावाजा समोर येत आहे.

परळी नगर पालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून पाणी पुरवठा विभागात एकच गुत्तेदार पोसण्याचे काम मोठ्या शिताफीने नगर पालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केले आहे. मात्र आता या गुत्तेदारांनी कसा भ्रष्टाचार केला. कोठून खरेदी केली, कसा पुरवठा केला, आयएसआय ट्रेड असलेल्या वस्तू दिल्या की नाही याची सर्व माहिती पुढे आली आहे. गभीर बाब म्हणजे परळी शहरात दर महिन्याला अथवा दर वर्षाला नगर पालिका अंतर्गत एवढी दुरूस्ती कशाची झाली. त्याच बरोबर नवीन बोअरची मोटार, पाईप इतर वस्तू किती वेळेस खरेदी केल्या. या वस्तुवर ट्रेड मार्क होता की नव्हता, याची शहानिशा नगर पालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली की नाही. विशेष करून पाणी पुरवठा विभागातील इंजिनिअर हा डोळे झाकून निमुटपणे गुत्तेदाराला बळ देण्याचे काम करीत आहे. कसलीही शहानिशा न करता कोट्यावधीची बिले दुरूस्ती आणि नवीन मोटरीला दिली गेली आहेत. सदरील पुरवठा धारकांकडे या सर्व गोष्टी रितसर प्रमाणे कागदावर दाखविल्या. मात्र परळीत एवढ्या दुरूस्ती दर महिन्याला होती कसे, बिघाड झालेल्या मोटारी, फुटलेले पाईप हे नगर पालिकेच्या कोणत्या भंडारात ठेवले आहेत. त्याची रितसर नोंद झाली आहे का? त्यामुळे भांडारपाल अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुख्याधिकारी कांबळे, पाणी पुरवठा विभागाचा इजिनिअर साळवे यांनी गुत्तेदाराला पोसण्याचे काम केले असले तरी गुत्तेदाराच्या मनमानी आणि बोगस बिला संदर्भात भंडाराच्या लिखानावर या सर्व गोष्टी उघड होणार आहेत. त्यामुळे या भंडारामुळे मुख्याधिकारी, इंजिनिअर चांगलेच अडकणार असल्याचे बोलले जात आहे.


सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २४४ वा ■ शनिवार २४ मे २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २५ मे २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 244 ■ Saturday 24 May 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## तीन चाकी सरकारची दमछाक?

# लाडक्या बहिणीसाठी आदिवासी विकास विभागाचा निधी वळवला

मुंबई (सरकार): मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी निधी वर्ग करण्यास होणाऱ्या विरोधाला न जुमानता राज्य सरकारने पुन्हा आदिवासी विकास विभागाचा निधी वळविण्याचा निर्णय घेतला आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात मे महिन्याचे दीड हजार रुपये लाभ जमा करण्यासाठी आदिवासी विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी वळवण्यात आला आहे.

राज्य शासनाने शुक्रवारी शासन निर्णय जारी करत हा निधी महिला बालविकास विभागाकडे वर्ग केला. यापूर्वीही आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाचा ७१० कोटींचा निधी वळवण्यात आला आहे. हा निधी लाडक्या बहिणींना मे महिन्याच्या अनुदानापोटी दिला जाणार आहे त्यामुळे महायुती सरकारला या योजनेसाठी निधी मिळवताना दमछाक होत असल्याचे दिसून येत आहे.




राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर महिलांनी याचा लाभ घेतला. मात्र, सत्तेत येताच लाडकी बहीण योजनेची छाननी सुरू केली. त्यानंतर अनेक महिलांनी योजनेचा लाभ सोडला. सद्यस्थितीत राज्यात २ कोटी ४७ लाख लाभार्थींना लाभ मिळतो; परंतु दरमहा आर्थिक मदत देण्यासाठी सरकारकडे निधी नसल्याने इतर खात्यांचा निधी वळवावा लागत असल्याचे दिसून येत आहे.

सरकारने अनुसूचित जमाती उपाययोजनेसाठी २१ हजार ४९५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी आदिवासी विकास खात्याला देण्यात आलेल्या ३ हजार ४२० कोटी रुपयांच्या सहाय्यक अनुदानातून लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचा हप्ता देण्यासाठीही मे महिन्याच्या सुरुवातीलाच ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला आणि बालविकास विभागाकडे वर्ग करण्यात आला होता. आता पुन्हा एकदा मे महिन्याचा हप्ता देण्यासाठी आदिवासी खात्यातून ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी वळविण्यात आला आहे. यापुढे लाडक्या बहिणींना हप्ता देण्यासाठी आदिवासी विकास खात्यातून प्रत्येक महिन्याला असा निधी वळता केला जाणार आहे, अशी माहिती मिळत आहे.

# परळीच्या उड्डाण पुलावरुन'नो एण्ट्री'!

परळी (सरकार):बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंगस्थान असलेल्या परळी वैजनाथ शहरात प्रवेश करायचा झाल्यास डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपूल ओलांडल्याशिवाय गत्यंतरच नाही. मात्र आता तब्बल एक महिना परळी शहरातील मुख्य प्रवेशद्वारावरुन तुम्हाला वाहन घेऊन एन्ट्री करता येणार नाही. परळी शहरात यायचेच असेल तर परळी शहराच्या बाजूचे पर्यायी रस्ते व बायपास रस्त्याचा उपयोग करावा लागणार आहे. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपूल वाहतुकीसाठी तब्बल एक महिन्यापेक्षा अधिक दिवसांसाठी बंद करण्यात येणार असल्याची सूचना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नुकतीच जारी केली आहे.

परळी वैजनाथ शहरातील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूलाची दुरुस्ती करण्याकरिता पुलावरील वाहतूक एक महिना चार दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. याबाबत उपविभागीय



अभियंता, रा. म. उपविभाग लातूर यांनी जा.क्र.रा.म.उ. बि.ला/तां. शा/२०२/ २०२५ दि.२९/ ०४/२०२५पत्र निर्गमित केले आहे. संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने परळी वैजनाथ शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ब वरील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूलाची तांत्रिक दुरावस्था लक्षात घेता त्या पुलाचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे. दुरुस्तीच्या कामास अडथळा येऊ नये व वाहतुकीतील अपघाताचा धोका टाळण्यासाठी पुलावरील सर्व प्रकारची वाहतूक दि.२६/०५/२०२५ पासून दि. ३०/०६/२०२५ पर्यंत कालावधीत बंद ठेवावी लागणार आहे. वाहतूकीसाठी परळी बायपास हाच पर्यायी मार्ग राहणार आहे.त्यामुळे दि.२६/०५/२०२५ पासून दि. ३०/०६/२०२५ पर्यंत वाहतूक बंद ठेवून सहकार्य करावे असे आवाहन श.म. उरगूंडे (उपविभागीय अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग लातूर) यांनी केले आहे.

# कोयाळमध्ये सर्पदंशाने दोन सख्या भावंडांचा झोपेतच मृत्यू

धारूर (सरकार)तालुक्यातील कोयाळ गावात २४ मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने संपूर्ण गावाला हादरवून सोडले आहे. मुंडे कुटुंबातील दोन निष्पाप चिमुकल्यांचा सर्पदंशामुळे मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली.



प्रदीप मधुकर मुंडे यांची सात वर्षांची मुलगी कोमल आणि पाच वर्षांचा मुलगा शिवम हे रात्री झोपेत असताना त्यांच्या अंगावर साप आला. सर्पदंश झाल्यानंतर दोघांची प्रकृती झपाट्याने खालावली. तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच दोघांचाही मृत्यू झाला.या घटनेमुळे संपूर्ण कोयाळ गावावर शोककळा पसरली आहे. मुंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आहेत. सर्पदंशामुळे एका कुटुंबातील दोन निष्पाप जीवांचा गेलेला बळी सर्वत्र हळहळ निर्माण करणारा आहे.

## शेतीच्या बांधावरून जाणारा शेत रस्ता आता १२ फुटांचा; महसूल विभागाचा मोठा निर्णय

मुंबई (सरकार):आधुनिक शेतीचा पूर्ण लाभ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी महसूल विभागानं मोठा निर्णय घेतला आहे. शेतीच्या बांधावरील पारंपरिक अरुंद शेतरस्ते आता किमान ३ आणि सर्वसाधारणपणे ४ मीटर म्हणजे जवळपास १२ फूट रुंद करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे.

शेतकऱ्यांचा आधुनिक शेतीकडे वाढता कल, मोठ्या कृषी अवजारांची वाहतूक तसेच शेतीमाल योग्य वेळेत बाजारपेठेत पोहोचावा, यासाठी हा निर्णय शेतीसाठी महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. याबाबतचा शासन आदेश महसूल विभागाकडून जारी करण्यात आला असून, त्याचा राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



बीड : भारतीय सैनिकांच्या शौर्य कार्याबद्दल शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी शहरातून मोटारसायकलवर तिरंगा रॅली काढली . या तिरंगा रॅलीत मोठ्या प्रमाणात शिवसैनिक सहभागी झाले होते . (छाया : कृष्णा शिंदे)

# माळेगावात धारदार शस्त्राच्या धाकावर लाखोंचे दागिने, रोकड लुटली

केज (सरकार): तालुक्यातील माळेगाव येथील नवीन प्लॉटवरील वसाहतीत राहणाऱ्या आण्णा कोंडीबा चाळक यांच्या घराचे दार गुरुवारी पहाटे ३ वाजण्याच्या दरम्यान तोडून तोंडाला कपडा बांधलेल्या चौघांनी घरात प्रवेश केला. चोरट्यांनी पती, पत्नीला चाकूचा धाक दाखवून नगदी रोख ७४ हजारासह एकूण ४ लाख ४४ हजार रुपयांचे दागिने व ऐवज लुटला.



केज तालुक्यातील माळेगाव येथील प्लॉटवरील नवीन वसाहतीतराहणारे आण्णा कोंडीराम चाळक हे शेतकरी आपल्या घरात कुटुंबियांसह झोपले होते. गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या दरम्यान घराचे दार तोडून २५ ते ३० वयोगटातील चार अनोळखी तरुण तोंडाला रुमाल बांधून घरामध्ये घुसले. धारदार शस्त्राचा आण्णा चाळक व त्यांच्या पत्नीला धाक दाखवून कपाटात ठेवलेले एक तोळ्याचे झुंबर जोड, ७ ग्रॅमचा नेकलेस, ७ ग्रॅमचे मिनी गंठण, ५ ग्रॅमची सोन्याची ठुशी, ४ ग्रॅमचे मनी, मंगळसूत्र, ५ ग्रॅमची अंगठी आशा दागिन्यासह,नगदी रोख ७४ हजार रुपये मिळून एकूण ४ लाख ४४ हजार रुपयाचा ऐवज चोरट्यानी लंपास केला. या प्रकरणी अण्णा कोंडीराम चाळक यांच्या फिर्यादी वरून युसूफवाडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे करीत आहेत.

या प्रकरणी पावसाळी वातावरण असल्यामुळे श्वान पथका ऐवजी ठसे तज्ञाचे पथक पाचरण करण्यात आले होते. दरम्यान, माळेगाव येथील कपड्याच्या दुकानासह इतर दोन ठिकाणीही चोरट्यानी चोरीचा प्रयत्न केला होता. परंतु त्याठिकाणचे नागरिक जागे झाल्यामुळे तेथील चोरीचा त्यांचा प्रयत्न फसल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली.

## काळजी करू नका-राहुल गांधी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरला प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्ताने नियंत्रण रेषेवरून भारतीय हद्दीत मोठ्या प्रमाणावर गोळीबार केला होता. या गोळीबारात नियंत्रण रेषेजवळच्या अनेक गावांत मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाली होती. त्यात पुंछमध्ये सर्वाधिक नुकसान झाले होते. दरम्यान, काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज जम्मू काश्मीरमधील पुंछ येथे जात पाकिस्तानच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांची विचारपूस केली. यावेळी काही शालेय विद्यार्थ्यांशीही संवाद साधत राहुल गांधी यांनी त्यांना धीर दिला.

## मान्सून केरळात दाखल; महाराष्ट्रासह १५ राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा

पुणे (सरकार): राज्यात गेल्या आठवड्यापासून पूर्वमान्सूनने जोरदार हजेरी लावल्यानंतर आता मान्सूनने केरळमध्ये आठ दिवस आधीच हजेरी लावली आहे. मान्सून अखेर केरळमध्ये दाखल झाला असल्याची घोषणा भारतीय हवामान खात्याने केली आहे.



दरम्यान, भारतात मान्सून यंदा वेळेआधीच दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, केरळमध्ये मान्सूनचं २४ किंवा २५ मे रोजीच आगमन होऊ शकतं. नेहमीपेक्षा एक आठवडा आधीच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २००९ मध्ये मान्सून केरळात २३ मे रोजी दाखल झाला होता. त्यानंतर १५ वर्षांनी मान्सून इतक्या लवकर केरळात दाखल झाला आहे.आता पुढील चार ते पाच दिवसांत कोकणात दाखल होण्याची शक्यता आहे. कोकणात सध्या जोरदार मान्सूनपूर्व पाऊस सुरु असून मुंबईत १ जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. केरळ हे मान्सूनचे भारतातील प्रवेशद्वार मानले जाते. केरळात प्रवेश केल्यानंतर नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सून देशभरात आगेकूच करतो. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, दिल्ली, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेशमध्ये गडगडाटासह पावसाचा इशारा दिला आहे. तर बिहार, झारखंड आणि ओडिशामध्ये २६ मेपर्यंत मुसळधारेचा अंदाज व्यक्त केला आहे. १५ हून अधिक राज्यांत पुढील काही दिवस अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

# संपादकीय

## शस्त्रास्त्र उत्पादकांना युद्धांमुळे लाभले बळ

जगातील मंदीसदृश स्थितीचा फटका शस्त्रास्त्र उत्पादकांना बसला आहे. जागतिक बाजारात शस्त्रास्त्र उत्पादकांची उलाढाल कमी झाली होती. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया, इराण-इस्त्रायल आणि गाझापट्टीमध्ये संघर्ष पेटूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. अशा स्थितीमध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू झालेल्या युद्धामुळे जागतिक शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या..

शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठेत बरेच बदल झाले आहेत. संरक्षणशस्त्रांचे उत्पादन करणाऱ्या देशांमधील कंपन्या दलालांना हाताशी धरून आपली निर्यात वाढवत असतात. अमेरिका आणि रशिया हे शस्त्रास्त्र उत्पादनातील आणि निर्यातीतील मोठे खेळाडू होते. भारतासह अनेक देश त्यांच्याकडून शस्त्रे खरेदी करतात. अलीकडच्या काही वर्षांमध्ये भारताने 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून शस्त्रास्त्रांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर भर दिला आहे. भारताने केवळ स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट ठेवलेले नाही, तर तो आता निर्यातीच्या मार्गावर निघाला आहे. जगातील अनेक देशांना भारत शस्त्रास्त्रे पुरवायला लागला आहे. ही निर्यात २५ हजार कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. दुसरीकडे, युरोपमधूनही शस्त्रास्त्रांची मागणी कमी झाली आहे. शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठांमध्ये काहीशी मंदी असल्याने उत्पादक चिंतेत होते. गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया युद्ध, इराण-इस्त्रायल संघर्ष, गाझा पट्टीतील लढा सुरू असूनही शस्त्रास्त्र उत्पादनांची मागणी वाढत नव्हती. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत अजूनही अमेरिका अव्वल आहे; परंतु रशियाचा वाटा मात्र घटला आहे. असे असले, तरी भारत-पाकिस्तान युद्धात रशियाची संरक्षण सामग्री ही चीन आणि अमेरिकेच्या सामग्रीपेक्षा उजवी असल्याचे सिद्ध झाले. त्याचा परिणाम आगामी शस्त्रास्त्र विक्रीवर होऊ शकतो. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या अहवालानुसार, युरोपीय 'नाटो' सदस्य अमेरिकेने पुरवलेल्या शस्त्रास्त्रांवर अवलंबित्व वाढवत आहेत. या पार्श्वभूमीवर शस्त्रास्त्रांच्या जागतिक बाजारपेठेतला सूर दखलपात्र आहे.

२०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान युरोपीय 'नाटो' सदस्यांकडून शस्त्रास्त्रांची दुप्पट आयात झाली. अमेरिकेने या शस्त्रास्त्रांपैकी ६४ टक्के पुरवठा केला, जो २०१५-१९ च्या तुलनेत (५२ टक्के) लक्षणीयरीत्या जास्त आहे. फ्रान्स आणि दक्षिण कोरिया (प्रत्येकी ६.५ टक्के), जर्मनी (४.७ टक्के) आणि इस्रायल (३.९ टक्के) हे इतर मुख्य पुरवठादार होते. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात रशियाच्या वाढत्या आक्रमक भूमिकेमुळे आणि ट्रान्सअटलांटिक संबंधांमधील तणावामुळे युरोपीयन 'नाटो' देशांनी शस्त्रास्त्र आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि युरोपीयन शस्त्रास्त्र उद्योगाला बळकटी देण्यासाठी पावले उचलली. युरोपीय 'नाटो' देशांनी अमेरिकेकडून सुमारे ५०० लढाऊ विमाने आणि इतर अनेक शस्त्रे ऑर्डर केली आहेत. गेल्या काही काळात अमेरिकेने शस्त्रास्त्र निर्यातीत आपला वाटा वाढवला, तर रशियन निर्यातीत घट झाली. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान अमेरिकेची शस्त्रास्त्र निर्यात ३५ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत वाढली. २०२०-२४ मध्ये अमेरिकेने १०७ देशांना प्रमुख शस्त्रे पुरवली.

गेल्या दोन दशकांमध्ये २०२०-२४ मध्ये पहिल्यांदाच अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीचा सर्वात मोठा वाटा मध्य पूर्वेला (३३ टक्के) न देता युरोपला (३५ टक्के) गेला. तरीही सौदी अरेबिया अमेरिकन शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा आयातदार राहिला. (अमेरिकेच्या शस्त्रास्त्र निर्यातीच्या बारा टक्के). लढाऊ विमानांसारख्या प्रगत लांब पल्ल्याच्या हल्ल्याच्या क्षमतांसाठी अमेरिका हा पसंतीचा पुरवठादार आहे. अमेरिकेच्या तुलनेत, २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान रशियन शस्त्रास्त्रनिर्यातीत झपाट्याने घट झाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर पूर्ण आक्रमण करण्यापूर्वी ही घसरण सुरू झाली. युक्रेनविरुद्धच्या युद्धामुळे रशियाच्या शस्त्रास्त्र निर्यातीतली घट आणखी वाढली.

२०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान फ्रान्सने इतर युरोपीय देशांना केलेल्या प्रमुख शस्त्रास्त्रांच्या निर्यातीत जवळजवळ तिप्पट वाढ झाली. हे प्रामुख्याने ग्रीस आणि क्रोएशियाला लढाऊ विमानांचा पुरवठा आणि २०२२ मध्ये रशियाच्या पूर्ण आक्रमणानंतर युक्रेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा यामुळे घडले. युरोपियन देशांना फ्रान्समधून १५ टक्के शस्त्रास्त्रे निर्यात झाली. फ्रान्सकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे मिळवणारा कतार हा दुसरा सर्वात मोठा देश होता. २०२०-२४ मध्ये चीन हा शस्त्रास्त्रांचा चौथा सर्वात मोठा निर्यातदार होता. जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत त्याचा वाटा ५.९ टक्के होता. चीन शस्त्रास्त्र निर्यात वाढवण्याचे प्रयत्न करत असूनही अनेक मोठे आयातदार राजकीय कारणांमुळे चिनी शस्त्रे खरेदी करत नाहीत. आशिया आणि ओशनिया हे शस्त्रास्त्र आयात करणारे सर्वात मोठे प्रदेश आहेत. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान आशिया आणि ओशनियातील देशांमध्ये जाणाऱ्या जागतिक शस्त्रास्त्र हस्तांतरणाचा वाटा ४१ टक्क्यांवरून ३३ टक्क्यांपर्यंत घसरला. या प्रदेशातील आयातीत २१ टक्के घट ही मुख्यतः दोन कालावधीत चीनच्या शस्त्रास्त्र आयातीत ६४ टक्के घट झाल्यामुळे झाली. कारण त्यांनी प्रामुख्याने रशियाकडून होणाऱ्या आयातीऐवजी स्थानिक पातळीवर डिझाइन केलेल्या आणि उत्पादित शस्त्रास्त्र प्रणालींवर भिस्त ठेवली. आज चीनच्या देशांतर्गत शस्त्रास्त्र उद्योगाची क्षमता वाढत असताना त्याची शस्त्रास्त्र आयात कमी होत राहण्याची अपेक्षा आहे.

जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रांच्या दहा सर्वांत मोठ्या आयातदारांमध्ये आशिया आणि ओशनियामधील चार देशांचा समावेश आहे. ते म्हणजे भारत, पाकिस्तान, जपान आणि ऑस्ट्रेलिया. १९९०-९४ नंतर पहिल्यांदाच चीन पहिल्या दहा शस्त्रास्त्र आयातदार देशांमधून बाहेर पडला. २०२०-२४ मध्ये अमेरिका या प्रदेशासाठी मुख्य पुरवठादार होता. त्यांचा प्रादेशिक शस्त्रास्त्र आयातीत ३७ टक्के वाटा होता. रशिया (१७ टक्के) आणि चीन (१४ टक्के) असा वाटा होता. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र आयातदार होता. त्याच्या आयातीला चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांकडून असणाऱ्या धोक्यांचा संदर्भ होता. तथापि, २०१५-१९ ते २०२०-२४ दरम्यान त्याची आयात ९.३ टक्क्यांनी कमी झाली. भारतीय शस्त्रास्त्र आयातीपैकी सर्वात मोठा वाटा (३६ टक्के) रशियाकडून आला, जो २०१५-१९ (५५ टक्के) आणि २०१०-१४ (७२ टक्के) पेक्षा खूपच कमी आहे. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान पाकिस्तानकडून शस्त्रास्त्र आयात ६१ टक्क्यांनी वाढली. दरम्यान, पुरवठादार म्हणून चीन आणखी प्रबळ झाला. २०२०-२४ मध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के वाटा चीनचा होता, जो २०१५-१९ मध्ये ७४ टक्क्यांवरून वाढला आहे. २०१५-१९ आणि २०२०-२४ दरम्यान पूर्व आशियाई देशांकडून शस्त्रास्त्र आयात २२ टक्क्यांनी कमी झाली, चीनकडून शस्त्रास्त्र आयातीत मोठी घट झाली आणि तैवान (- २७ टक्के) आणि दक्षिण कोरिया (- २४ टक्के) यांच्या आयातीत लक्षणीय

शस्त्रास्त्रांच्या आयातीमध्ये वाढ करणारा जपान (+९३ टक्के) हा एकमेव पूर्व आशियाई देश होता. युरोप आणि मध्य पूर्वेला शस्त्रास्त्रांची आयात माध्यमांचे लक्ष वेधून घेत असताना आशिया आणि ओशनिया हे २०२०-२४ मध्ये जगातील सर्वात मोठे शस्त्रास्त्र आयात करणारे क्षेत्र राहिले. या प्रदेशातील बहुतेक शस्त्रास्त्र खरेदीमागे चीनशी संबंधित धोक्याची धारणा आहे. मध्य पूर्वेला होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या आयातीपैकी अर्ध्याहून अधिक आयात अमेरिकेतून (५२ टक्के) झाली तर १३ टक्के इटलीतून, ९.८ टक्के फ्रान्समधून आणि ७.६ टक्के जर्मनीतून झाली. प्रादेशिक संघर्ष आणि तणाव मध्य पूर्वेमध्ये शस्त्रास्त्रांच्या आयातीची मागणी वाढवत आहेत. असुरक्षित युद्ध आणि संघर्षांमुळे पश्चिम आफ्रिकेमध्ये शस्त्रास्त्रांची आयात झपाट्याने वाढली आहे. गेल्या १५ वर्षांमध्ये सुरक्षा परिस्थिती बिघडल्यामुळे पश्चिम आफ्रिकेत शस्त्रास्त्रांचे हस्तांतरण झपाट्याने वाढले आहे. आता भारत आणि पाकिस्तानमधील युद्धाच्या परिस्थितीत जागतिक शस्त्रास्त्र पुरवठादार कंपन्यांना चांगले दिवस येण्याचे स्वप्न पडायला लागले आहे.

# बालकांना जबाबदारीची जाणीव व्हावी



चिंतन, मनन करून पालक दमले, पण कौमार्य अवस्थेतील बालकांना आवर घालण्यात कमीच पडत आहेत. बालकांची प्रत्येक बाबतीतील लींीळेींळीं इतक्या टोकाला पोहोचली आहे की त्यापुढे परिणामाचा विचार करण्याची सद्सदविवेक बुद्धी कामचं करत नाहीये. एकमेकांना चॅलेंज देणे आणि ते चॅलेंज जिंकण्यासाठी कुठल्याही पातळीवर जाण्याचे धाडस करणे ही बाब अनेक गंभीर घटनाकडे बालकांना वळवत आहे. याचे चिंतन होणे आणि प्रभावी उपाययोजना शोधणे आवश्यक झालं आहे.

काही मुद्दे परत परत विचारात घेणे महत्त्वाचे आहे. बालकं अशी का वागतात? हा प्रश्न प्रत्येक पालकांना पडतो आहे. पालक-बालक यांच्यातील दरी ही काही नवीन नाहीये. पालक-बालक यांच्यात वैचारिक द्वंद सुरूच आहे आणि काळानुसार सगळ्या संकल्पना बदलत जाणारचं आहेत. पालकांना ज्या गोष्टी खूप गंभीर वाटतात त्या बालकांना तितक्याशा गंभीर वाटतं नाही. नीतिमत्ता, प्रामाणिकपणा या सगळ्यांचा फारसा प्रभाव आता बालकावर दिसून येत नाही. बालक आपल्या पालकांच्या विचारांशी त्यांनी जपलेल्या नियमांशी तितकेसे जोडलेले पण नाही. ज्यांच्या घरी कधी कोणी डान्स बारमध्ये गेल्याचा इतिहासच नाही किंवा त्याचं नाव देखील घरी काढलं जात नाही अशा घरची एक बालिका आपल्या मित्रासोबत घरी काहीही न सांगता जात असे. तिच्या सोबत तिथे वाईट प्रकार घडला आणि नंतर ती स्वतःच तिकडे कुतूहल म्हणून गेली होती. तिला कोणीही जबरदस्ती तिथे घेऊन गेले नव्हते ही माहिती समोर आली. पण तिथे तिच्या सोबत जे घडले ते तिच्या मर्जीने नव्हते त्यात तिची इच्छा सामील नव्हती हे बालिकेने सांगितले. अर्थात तिथे जाणे हे काही वाईट वगैरे नाही, असे विचार बालिकेने तिच्या मित्र-मैत्रिणींकडून ग्रहण केले होते आणि ते तिला बरोबर वाटले होते. म्हणून ती तिथे गेली इथपर्यंत तिला तिचं काही चुकलं असे नाही वाटले आणि पुढे जे काही झाले ते तिच्या सोबत चुकीचे झालं असं तिचं सांगणं होतं. जे घडलं तो गुन्हा होताच पण हा टाळता आला असता हे पालकांचे विचार होते. यात नेमकं द्वंद काय तर चूक बरोबर या संकल्पनामध्ये होत जाणारा बदल. या बदलामुळे पालक-बालक यांच्यात निर्माण होत जाणारी दरी. ही दरी डोहात रूपांतरित होत जाते आणि पालक बालकांच्या विश्वातून खूप लांब होत जातात. बालक आपल्याभोवती एक कोश निर्माण करतात आणि त्यात पालकांना प्रवेश नसतो.

एक बाळ जन्माला येतं त्या क्षणापासून पालकांकडे अनेक गोड स्मृती असतात बालकांच्या. कालांतराने या स्मृती फक्त पालकांच्या होऊन जातात. बालक त्याच्या वाढत्या वयानुसार ते विसरत जातं. जन्म झाल्यापासून तर सहा ते सात वर्षांपर्यंत बालकांना विशेष काही आठवत नसतं हे शास्त्र सांगतं. त्या काळातील स्मृती फक्त पालकांच्या असतात. पुढे कालांतराने बालकांसाठी त्या त्यांच्या पालकांनी सांगितलेल्या सत्य कथा असतात. स्मृती म्हणून त्यांच्याशी ते जोडलेल्या नसतात. एखाद्या कुटुंबात खूप बिंबवून काही गोष्टी सांगितल्या जातात पण नेमकी तीच रेष बालक ओलांडतात का तर लींीळेींळीं म्हणून. आता यावर उपाय काय करायला हवे हा प्रश्न शिल्लक उरतोच. पालकांचे बालकाशी कितीही मैत्रीपूर्ण संबंध असले तरी काही गोष्टी तो लपवणारच हे निश्चित आहे. म्हणून आपण पाळलेले आदर्श त्यांनी पाळावेच याचा अती आग्रह न धरता ते पाळले नाही, तर कुठले संभाव्य धोके होऊ शकतात, त्यातून बाहेर पडण्यासाठी काय करावं आणि स्वतःला सुरक्षित कसं ठेवावं याची खुली चर्चा व्हायला हवी. चर्चेदरम्यान पालकांनी बालकांना बोलण्याची व्यक्त होण्याची संधी द्यावी. आधीच एखाद्या बाबतीत नकारात्मक विचार पालकांकडून व्यक्त होत असतील, तर बालक त्यावर काहीही बोलणार नाही. म्हणून खुली चर्चा होणं, ती घडवून आणणं आवश्यक आहे. आपल्या बालकाकडून इतरांना गंभीर ईजा होऊ नये आणि त्याला पण काही नुकसान होऊ नये याची माहिती न चिडता, रागावता चर्चेतून बालकापर्यंत पालक पोहोचवू शकले, तर खूप धोके टाळता येतील. इतरांच्या भावनांची जाणं असणं, दुसऱ्याचा त्रास कळणं. हा माणूस असण्याचा पुरावा आहे. ही गोष्ट बालकामध्ये रुजविण्याची पद्धत बदलण्याची गरज आहे. यासाठी बालकांचे समाजीकरण योग्य मार्गाने व्हायला हवं आहे. प्रत्येक पिढीतील व्यक्तीशी बालकांनी बोलायला हवंय. आज आपण बघतो, बालक केवळ त्यांच्या वयातील बालकांशी जास्त संवाद साधतात किंवा फार तर थोड्या मोठ्या बालकांशी बोलतात. ते ही प्रत्यक्ष कमीच. अनुभवांची कक्षा मोठी असलेली व्यक्ती बालकांच्या संपर्कात असली तरी त्यांच्याशी बोलणं त्यांना फारसं आवडत नाही. कारण ते अनुभव केवळ लेक्चर म्हणून आपल्यापर्यंत येत आहेत याची जाणीव बालकास होते आणि त्याला ते नकोसं वाटतं. म्हणून हे अनुभव खुली चर्चा मोकळं बोलणं फक्त शेअरिंग या अंगाने असेल, तर ते बालकाकडून स्वीकारलं जातं. कदाचित जो धडा घ्यायचा तो त्यांचे ते घेतात, पण जर आपण आग्रह कमी केला तर...

# साखर सोडल्यावर शरीरात काय परिणाम होतात?

तुम्हाला हे वाचून आश्चर्य वाटेल मात्र गेल्या दहा वर्षांपासून विकसित देशात साखर खाणं कमी केलं आहे. याची अनेक कारणं आहे.

उदा. चवीत आणि दिनचर्येत बदल. गेल्या दहा वर्षात कार्बोहायड्रेट्स कमी असलेल्या आहाराकडे लोकांचा कल वाढला आहे. किटो इत्यादी डाएट प्रकाराला लोकांनी पसंती दिली आहे. तसंच अति प्रमाणात साखर खाण्याचा धोकाही लोकांना कळला आहे.

साखर कमी करण्याचे किंवा कमी गोड खाण्याचे फायदे आहेतच. कमी साखर खाल्याने शरीरात कमी कॅलरीज जातात, त्यामुळे वजन कमी व्हायला मदत होते, दातांचं आरोग्य सुधारतं. मात्र कमी गोड खाल्ल्याने मूड स्विंग, डोकेदुखी, हे तोटे आहेत. हे तोटे थोड्या काळासाठी असतात. याची कारणं अद्यापही ठाऊक नाही. गोड पदार्थ समोर आल्यावरची ही प्रतिक्रिया असावी असा अंदाज आहे.

कार्बोहायड्रेट्स साखरेसह वेगवेगळ्या पदार्थात असतात. तसंच अनेक फळांमध्ये आणि दुधातही असतात. आपण रोजच्या जेवणात जी साखर खातो ती उसात, बीट आणि मॅपल सिरपमध्ये असते. तर मधात ग्लुकोज आणि फ्रुक्टोज हे घटक असतात.

हल्ली कोणत्याही पदार्थाचं मोठ्या प्रमाणात उत्पादन होतं. अनेक पदार्थ आकर्षक दिसण्यासाठी त्यात वेगवेगळ्या प्रकारची साखर घालतात. त्यामुळे पदार्थाची चव तर छान लागतेच पण त्याचबरोबर साखरेचे मेंदूवरही तितकेच परिणाम होतात. हा परिणाम इतका मोठा असतो की साखरेचं व्यसन लागू शकतं. अर्थात हा दावा अजूनही तपासून पाहिला जात आहे.







सुक्रोज या साखरेतील घटकामुळे जीभेवरील गोड चवीचे रिसेप्टर कार्यान्वित होतात. त्यामुळे मेंदूत डोपामाईन नावाचं रसायन मेंदूत तयार होतं. या रसायनामुळे मेंदूत आनंद लहरी तयार होतात. म्हणून काहीतरी छान खायची इच्छा होते. विशेषत: चमचमीत खाणं. डोपामाईनला ठशुरीव लहशाळलरश्र असंही म्हणतात. Reward म्हणजे बक्षीस. याचाच अर्थ असा की डोपामाईन मेंदूत तयार झालं की स्वत:ला काहीतरी बक्षीस देण्याची इच्छा होते आणि बऱ्याचदा हे बक्षीस साखरेच्या रुपात मिळावं असं वाटतं.

हे सगळं कसं होतं याबद्दल माणसं आणि प्राणी यांच्यावर संशोधन करण्यात आलं आहे.

अति गोड पदार्थांमध्ये तर स्वत:ला बक्षिस देण्याची क्षमता कोकेनपेक्षा जास्त असते. गोड पदार्थांची चव जिभेवर तरळली किंवा इंजेक्शनवाटे दिली तरी बक्षीस देण्याची उर्मी जागी होते असं उंदरांवर केलेल्या अभ्यासात समोर आलं आहे. त्यामुळे गोडवा कितीही असला तरी परिणाम एकच असतो हे सिद्ध झालं आहे. सुक्रोझ घेतल्याने डोपामाईन मुळे मेंदूच्या रचनेवर परिणाम होतात. तसंच प्राणी आणि मनुष्यप्राण्यांमध्ये भावनिक बदल होतात.

साखरेचा आपल्यावर परिणाम होतो हे अगदी स्वाभाविक आहे. त्यामुळे साखर न खाल्ल्यामुळे शरीरावर त्याचे परिणाम होतातच. साखर सोडल्यावर मानसिक आणि शारीरिक लक्षणं लगेच दिसायला सुरुवात होते. त्यात डिप्रेशन, काळजी, वारंवार काहीतरी खाण्याची इच्छा, मेंदूत थकवा, डोकेदुखी, झोप येणे या लक्षणांचा समावेश आहे. याचाच अर्थ साखर सोडली की प्रसन्न वाटत नाही. म्हणून या बदलाशी जुळवून घेणं अनेकांना अवघड जातं.

या लक्षणांचा अद्याप सखोल अभ्यास झालेला नाही. मात्र त्यांचा संबंध बक्षिस देण्याच्या व्यवस्थेशी असावा असा कयास आहे. साखरेचं व्यसन हा वादग्रस्त मुद्दा असला तरी साखरेमुळे स्वत:वर ताबा न राहता सतत खायची इच्छा होते. तसंच एखादं व्यसन सोडल्यानंतर जी लक्षणं दिसतात ती दिसायला सुरुवात होते. नंतर पुन्हा साखरेचं व्यसनही लागू शकतं. हा सगळा परिणाम अंमली पदार्थांसारखाच आहे. मात्र हे सगळं प्राण्यांमध्ये दिसलं आहे. त्यामुळे माणसांवर हेच परिणाम होतात का हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

बक्षीस देण्याची उर्मी ही प्रक्रिया माणसाच्या उत्क्रांतीनंतरही कायम राहिली आहे. इतर प्राण्यांच्या मेंदूतही अशीच प्रक्रिया होत असते. त्यामुळे साखर सोडल्यावर जे परिणाम प्राण्यांमध्ये दिसतात तेच परिणाम मनुष्यप्राण्यांमध्ये पहायला मिळण्याची दाट शक्यता आहे.

अन्नातून साखर काढली तर डोपामाईनच्या परिणामांमध्ये वेगाने घट होते. त्यामुळे मेंदूच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता आहे.मेंदूच्या बदललेल्या रासायनिक रचनेमुळे साखर सोडल्यावर किंवा कमी केल्यावर त्याची लक्षणं दिसू लागतात. बक्षीस प्रक्रियेत डोपामाईनचा सहभाग असतोच पण त्याचबरोबर हार्मोन्सवर नियंत्रण ठेवण्यातही डोपामाईनचा सहभाग असतो. म्हणून ओकाऱ्या, चिंता, नॉशिया अशा प्रकारची लक्षणं आढळतात. रोजच्या जेवण्यातून साखर वगळल्यावर मेंदूच्या कार्यरचनेत फरक पडतो त्यामुळे अनेक लोकांना ही लक्षणं ठळकपणे जाणवतात.साखर सोडल्यावरची लक्षणं मनुष्यप्राण्यांत कमी प्रमाणात आढळतात. तरीही पौगंडावस्थेतील लठ्ठ मुलांमध्ये साखर सोडल्यावर ती अधिकाधिक खाण्याची उर्मी आढळल्याचं एका संशोधनात सिद्ध झालं आहे.

### sweets

आहारात कोणताही बदल केल्यावर तो काटेकोरपणे पाळणं महत्त्वाचं असतं. जर तुम्हाला साखर सोडायची असेल तर पहिले काही आठवडे फारच कठीण असतात.मात्र साखर तितकीही वाईट नाही हेही तितकंच खरं आहे. मात्र संतुलित आहार आणि योग्य व्यायामाची जोड दिली तर साखर सोडायची पाळी येणार नाही. शेवटी 'थोडक्यात गोडी' असते असं म्हणतात ते उगाच नाही.

## नाडी शोधन प्राणायाम फायदे

अनुलोम विलोम प्राणायाम केल्याने मन शांत राहतं आणि ध्यान अवस्थेत जाण्यासाठी तयार असतं. दररोज काही मिनिटांसाठी हा सराव मनाला शांत, आनंदी आणि शांत ठेवण्यास मदत करतो. हे संचित तणाव आणि थकवा दूर करण्यास मदत करतं. शांत आणि मनावर लक्ष केंद्रित करण्यासाठी ही खूप चांगली प्रक्रिया आहे. भूतकाळाबद्दल खेद करणे आणि भविष्याबद्दल काळजी करणे ही आपल्या मनाची प्रवृत्ती आहे. नाडी शोधन प्राणायाम मनाला सध्याच्या क्षणाकडे परत आणण्यास मदत करतं. श्वसन प्रणाली आणि रक्त-प्रवाह प्रणालीशी संबंधित समस्यांपासून आराम मिळतो. मन आणि शरीरातील जमा ताण प्रभावीपणे काढून आराम करण्यास मदत करतं. आपल्या मेंदूच्या डाव्या आणि उजव्या गोलार्धांना सरेखित करण्यास मदत करतं, जे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या तार्किक आणि भावनिक बाबींशी संबंधित आहे. हे नाड्यांना शुद्ध व स्थिर करतं, जेणेकरून आपल्या शरीरात जीवन ऊर्जा वाहते. शरीराचे तापमान राखण्यास मदत करतं. नाडी शोधन प्राणायाम करताना या गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहे. श्वासावर ताण येऊ देऊ नका आणि श्वास घेण्याची गती सोपी ठेवा. तोंडातून श्वास घेऊ नका किंवा श्वास घेताना कोणत्याही प्रकारचे आवाज येता कामा नये. उज्जयी श्वास वापरू नका. कपाळ आणि नाकावर बोट फार हलक्याने ठेवा. कोणताही दबाव लागू करण्याची आवश्यकता नाही. नाडी शोधन प्राणायामानंतर जर तुम्हाला सुस्त आणि थकवा येत असेल तर श्वास आणि श्वासोच्छवासाकडे लक्ष द्या. श्वास बाहेर टाकण्याची वेळ इनहेलेशनपेक्षा जास्त लांब असावी अर्थात हळूहळू श्वास बाहेर काढा.

# घर आणि बाग

आपापल्या घराजवळ बाग किंवा बगीचा असावा, असे सर्वांना वाटते. मात्र, मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये जागेअभावी बगीचा शक्य नसतो. बाग शक्य असते. गच्चीवर किंवा खिडकीमध्ये झाडे लावून बाग बनवता येते. मात्र, झाडे लावली की संपले, असे नाही. झाडांसह बागेची निगा राखणे सर्वात महत्त्वाचे असते.

झाडांची निगा राखण्याचे अनेक प्रकार आहेत. त्यात महत्त्वाचा म्हणजे रोज न चुकता पाणी घालणे. तसेच आठवडय़ातून एकदा झाडांची साफसफाई करून त्यांना कुठल्या किडय़ांचा किंवा रोगाचा प्रादुर्भाव झाला नाही ना, हे पाहणे. गुलाब, टोमॅटो, मिरची, सिमला मिरची, चिनी गुलाब, रातराणी, भेंडी, वांगी या फळे आणि फुलांची रोपे सर्वात लवकर किटकांना बळी पडतात. या झाडांच्या तुलनेत मोगरा, इंडियन रबर, फर्न्स, पाम, शेवंती, झेंडू, जाई, जुई, काकडी, भोपळा, तोंडली, दोडकी, कारली, पालक, मेथी, कोथिबीर, कडूलिंब, मनी प्लांट, ओवा, गवती चहा या रोपांना कीड तसेच रोगांचा कमी त्रास होतो. त्यामुळे रोपे आणि झाडांची नीट निगा राखली नाही, तर कोणतेही रोप रोगाला बळी पडू शकते.

झाडांना वाढीसाठी पाणी आवश्यक आहे. मात्र, अति पाणीही त्यांच्यासाठी मारक ठरू शकते. कुंडीमधून पाण्याचा निचरा न होणे, बाग किंवा कुंडय़ा ठेवलेली जागा ओलसर राहणे, तसेच कुंडीखालील भांडय़ाची अस्वच्छता या गोष्टी किडय़ांच्या प्रादुर्भावाला कारणीभूत ठरतात. वेळेवर काळजी घेतली आणि साधेसोपे उपाय केले, तर कुठल्याही कीटकनाशकाचा वापर न करता बागेचे व्यवस्थित रक्षण करता येते. या कीटकांचे निरीक्षण करण्यासाठी घरात एक चांगले बहिर्वक्र भिंग ठेवा. त्यामुळे अतिसूक्ष्म किडय़ांचा शोध घेता येईल. शिवाय त्याचा वेगळा उपयोगही आहे. लहान मुलांना भिंगाद्वारे आपण शास्त्रीय माहिती देऊ शकतो.



टोमॅटो, गुलाब, मिरची, सिमला मिरची आणि वांगी यावर अगदी नेहमी आढळणारा उपद्रवी कीटक म्हणजे मावा. पेरू किंवा पेअर या फळांच्या आकाराचे हे कीटक म्हणजे हालचाल करणारा प्राणी असे समीकरण आपल्या डोक्यात बसलेले असते. लोकरीसारखी किंवा कापसासारखी, पण पावडरीची वाढ पुंजक्यांच्या स्वरूपात रोपांच्या पानावर दिसली, तर मावा असण्याची दाट शक्यता असते. त्यांच्यामुळे पाने विद्रुप दिसू लागतात. या माव्यांच्या उत्सर्जनात मधासारखा पदार्थ असतो. त्याला चिकटपणा असतो. त्यामुळे ते पानांवर चिकटून राहते. त्यावर कवके वाढू लागतात आणि रोप अधिकच रोगट होऊन पाने गळू लागतात. रोपांची वाढ खुंटते आणि कळ्या अकाली गळून पडतात. अशी रोपे किंवा चांगली वाढलेली झुडपे पाहता पाहता कोमेजून जातात.

हे मावे हिरव्या रंगाचे असतात. पण, कधी कधी लाल, तपकिरी, निळ्या किंवा करडय़ा रंगाचे मावेदेखील आढळतात. यांना क्वचितच पंख असतात. ते पानांमध्ये इतके छान दडून बसतात की, अगदी सूक्ष्म निरीक्षण केले तरच ते तिथे आहेत, असे समजते. पांढ-या माशा हा आणखी एक किटक. पांढ-या माशांचे जीवनचक्र ४ ते ६ आठवडय़ांचे असते. अंडी, कोष आणि कीटक अशा तीन अवस्था त्यांच्या जीवनचक्रात असतात. अळीची अवस्था अत्यंत कमी कालावधीची असते. या माशीच्या माद्या झाडांच्या पानाच्या खालच्या पृष्ठभागावर आपली अंडी घालतात. पानांचे सर्वात जास्त नुकसान या माशीच्या कोषावस्थेत होत असते. या माशादेखील पानांमधील आणि कळ्यांमधील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. गुलाब, झेंडू, शेवंती यांसारखी फुले आणीत असाल, तर त्यातून या माशा तुमच्या घरात दाखल होण्याची शक्यता असते. मावा आणि पांढरी माशी यांसारख्या कीटकांसारखा हा पिठा कीटकदेखील अचानक बागेत अवतरतो आणि सर्व रोपांचे नुकसान करण्याचा विडा उचलतो. इतर कीटकांसारखाच हाही जीवनचक्राच्या अंडी, अळी, कोष आणि प्रौढ अशा चार अवस्था असलेला कीटक आहे. पिठासारखा दिसणारा हा कीटक असतो. पिठासारखी झालेली वाढ कीटकासारखी न वाटता कवक किंवा बुरशी आल्यासारखी वाटते. एकदम छोटा असलेला कीडा सूक्ष्मदर्शक भिंग वापरून आपल्याला दिसू शकतो. नवीन रोपांबरोबर हा येऊ शकतो. मातीतून याचे आगमन होऊ शकते. ज्या कुंडय़ांमधील रोपे या रोगामुळे प्रभावित झाली आहेत, त्यांची पाने हात धुण्याच्या साबणाचे पाणी वापरून धुऊन काढावीत. कडूलिबाच्या तेलाचा फवारा मारावा. स्केल्स आणि स्पायडर (कोळी) कीटक आपल्याकडे फारसे नसतात. पण, असले तरी आपण त्यांचे नियंत्रण कीटकनाशकांशिवाय करू शकतो. आपल्याला आपल्या घरातील भाजीपाला पिकविण्यासाठी रासायनिक खतांची आणि कीटकनाशकांची गरज नसते.

# संस्था गुणवंताच्या दारी उपक्रमांतर्गत दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार संपन्न








**बीड (प्रतिनिधी):–** श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित,राजर्षी शाहू कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी दहावी बोर्ड परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. फेब्रू. मार्च –२५ झालेल्या परीक्षेत विद्यालयातील विशेष प्राविण्यामध्ये ७९ विद्यार्थिनी ,प्रथम श्रेणी १४ विद्यार्थिनी, द्वितीय श्रेणी ०४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. शाळेचा एकूण निकाल १००% लागला. जूजगव्हाण, काळेगाव, ढेकनमोहा, घाटसावळी, मौजवाडी, मौज, बाभूळखुंटा, काटे- वस्ती ,पांगरबावडी, पिंपळगाव–मोची, वायभटवाडी, बीड या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, संस्थेचे संचालक प्राचार्य ए. आर. डंबरे ,मु.अ. जी.एस. झोडगे,मु.अ.आर.टी.राऊत व शिक्षक वृंदांनी सदरील गावात जाऊन विद्यार्थिनीचा सत्कार केला. तसेच ९०% पेक्षा जास्त मार्क घेणाऱ्या विद्यार्थिनी २७आहेत.कु.महेक शेख ९४.४०,कु.नंदिनी सालगुडे ९४.२०, कु. अंकिता डावकर ९३.४०,कु. मोहिनी निर्धार ९३.४०, कु. अक्षरा पवार ९३.४०,कु.नंदिनी सपकाळ ९३.२०,कु. अदिती गलांडे ९३.००, कु. मीनाक्षी रोहिटे ९२.८०,कु. साक्षी कोलगुडे ९२.८०,कु. प्रीती पवार ९२.८०,कु. गायत्री कोटुळे ९२.८०, कु. स्वराली ननवरे ९२.६०,कु. साधना निर्धार – ९२.६०, कु. भाग्यश्री पवार ९२.४०,कु.श्रावणी काटे – ९२.००, कु. शिवानी येळे ९२.००, कु. वैष्णवी खवतड ९१.८०,कु. अस्मिता पवार ९१.६०,कु. प्रतिक्षा थापडे९१.४०,कु. आयेशाज.शेख९१.२०,कु. राधा दराडे ९१.००, कु. संध्या जाधव – ९०.८०, कु.भारती गोत्राळ९०.६०,कु.अल्फिया पठाण ९०.६०,कु. पूनम जाधव – ९०.२०, कु. गायत्री आखाडे – ९०.००,कु. पूजा बोरगे – ९०.०० वरील सर्व गुणवंत विद्यार्थिनीचे संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या

## विशेष वृत्त

### अवैध गुटखा साठ्यावर पोलिसांचा छापा; ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**गेवराईः** गेवराई तालुक्यातील पांढरवाडी येथे एका घरात आणि वाहनांमध्ये अवैधरित्या गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा ठेवल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने २० मे रोजी सकाळी ८.१० वाजता छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत ४०,३१,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दादासाहेब जाधव याच्यासह कर्नाटकातील मैनोद्दीन शेख आणि मध्यप्रदेशातील विकी महाटा यांच्याविरुद्ध कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस उपनिरीक्षक मुरकुटे, पोलीस हवालदार वाघ, ठोंबरे, राठोड, पठाण, शिंदे, सानप, वाघमारे आणि चालक वडमारे, राठोड यांनी गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. दादासाहेबच्या घरात आणि त्याच्या स्विफ्ट डिझायर व बोलेरो पिकअप वाहनांमध्ये विमल, आरएमडी, राजनिगंधा, हिरा आदी ब्रँड्सचे १०,७३० पुडे गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले. यात १६००० ते १२,७२,००० रुपये किमतीचा माल आणि दोन वाहनांचा समावेश आहे. दादासाहेबने गुटखा मैनोद्दीन शेख आणि विकी महाटा यांच्याकडून मिळाल्याचे सांगितले. पोलिसांनी पंचनामा करून मुद्देमाल तपासासाठी ताब्यात घेतला. तपास पोलीस उपनिरीक्षक रामदास खोत हे करत आहेत.

### प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शनासाठी सुविधा केंद्र

**बीडः** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, बीड शहरातील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक येथे इंजिनिअरिंग पदविका (पॉलिटेक्निक) शै.वर्ष–२०२५–२६ साठी प्रवेश प्रक्रिया तसेच मार्गदर्शनासाठी सुविधा केंद्र केंद्र सुरू करण्यात आले आहे. या सुविधा केंद्राचे उद्घाटन महविद्यालयाचे चे प्राचार्य. डॉ. बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले व नोंदणी करण्यासाठी आलेल्या पालकांच्या हस्ते करण्यात आले. इंजिनियरिंग पदविकेच्या प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया २०२५–२६ साठी तंत्रशिक्षण संचालनालय

महाराष्ट्र शासन यांनी अधिकृत एफसी सेंटरची स्थापना केली आहे. यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन मध्ये सुरू केलेल्या सुविधा केंद्राचा अचूक व मोफत नोंदणी करण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव मरलापल्ले यांनी केले आहे. या प्रसंगी महाविद्यालयाच्या सुविधा केंद्रामध्ये प्रथम नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यास व त्यांच्या पालकास प्राचार्य सरांच्या हस्ते नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व नोंदणी करण्यासाठी आलेले पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

### सनातन राष्ट्रासाठी 'रामराज्य संकल्प जपयज्ञा'द्वारे एक कोटी श्रीरामनामाचा जप

**बीड:** भारतात 'रामराज्य' हे केवळ एक धार्मिक आदर्श नव्हे, तर संस्कृती, नीती, आणि न्यायाधिष्ठित शासन व्यवस्थेचे प्रतीक मानले जाते. या महान उद्दिष्टाच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलत 'सनातन राष्ट्रा' साठी 'रामराज्य संकल्प जपयज्ञा'द्वारे एक कोटी श्रीरामनामाचा जप सनातन संस्थेच्या वतीने फर्मागुडी, फोंडा गोवा येथे आयोजित सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात करण्यात आला. 'देशविदेशातून आलेल्या २५ सहस्रपेक्षा अधिक भाविकांनी अत्यंत भावपूर्ण वातावरणात 'श्रीराम जय राम जय जय राम' असा नामजप केला. या जपयज्ञामुळे संपूर्ण वातावरण राममय झाले होते. जपयज्ञात बीड जिल्ह्यातील ५० हुन अधिक साधक, धर्मप्रेमी हिंदूंचा सहभाग ! या जपयज्ञाचा उद्देश म्हणजे राष्ट्राला अध्यात्मिक उर्जा देणे, नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना करणे आणि सनातन हिंदू संस्कृतीचा जागर घडवणे. या यज्ञात देशभरातील साधक, भक्त, धर्मप्रेमी आणि विविध धार्मिक संस्था सहभागी झाल्या. या जपयज्ञात बीड जिल्ह्यातील ५० हुन अधिक साधक, धर्मप्रेमी हिंदूंनी सहभाग घेतला.

## इस्कॉन तर्फे बालोत्सव साजरा

**बीड (प्रतिनिधी):** सावता माळी चौकातील श्री राधा गोविंद मंदिर या ठिकाणी १३ मे ते १८ मे यादरम्यान लहान मुलांसाठी बाल उत्सवाचे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बीड शहरातील लहान मुलांनी या पाच दिवशी शिबिरामध्ये बाल संस्कार वर्ग, चित्र रंगवणे स्पर्धा, सूर्यनमस्कार, श्लोक उच्चारण, योग व प्राणायाम यावर प्रशिक्षण घेतले. विशेष करून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, समाजसेवा, स्वच्छता, समाजामध्ये कसे वागावे .त्याचबरोबर आपल्या मधील वाईट गुणांवर मात करून चांगल्या गुणांचा कसा विकास करावा, यावरती श्रीमान कृष्णनाम प्रभू सुकुमारी देवी दासी, वीरजा गोपी देविदासी व चंद्रमुखी देवी दासी आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रविवार दिनांक १८ मे रोजी बीडचे ग्रामदेवता खंडेश्वरी मंदिर व दीपमाळ येथील खंडोबा मंदिरामध्ये सर्व विद्यार्थ्यांची सहल आयोजित करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील देवस्थानांची माहिती देऊन त्यांचे पावित्र्य कसे राखावे याविषयी विशेष मार्गदर्शन करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना श्रीमान ध्रुव नारायण प्रभू यांच्याद्वारे बक्षीस वितरण करण्यात आले. अशी माहिती इस्कॉन बीड चे प्रतिनिधी श्रीमान कृष्णनाम दास यांनी दिली.

## अंथरवण पिंपरी आश्रम शाळेचा दहावीचा शंभर टक्के निकाल!

**बीड (प्रतिनिधी):–** श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित माध्यमिक आश्रम शाळा अंथरवन पिंपरी तांडा ता. जि .बीड या आश्रम शाळेची दहावीच्या निकालाची उत्कृष्ट परंपरा याही वर्षी १००% कायम राहिलेली आहे .

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत शाळेतील एकूण ११६ विद्यार्थी परीक्षेस पात्र होते. त्यापैकी ११६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९०% पेक्षा अधिक गुण घेणारे विद्यार्थी २२, तर विशेष प्राविण्य मध्ये ५१, प्रथम श्रेणीत ३४ , तर द्वितीय श्रेणीत ०९ गुणानुक्रमाने सर्वप्रथम दोन विद्यार्थी आहेत.ङ्गचि.जाधवर महेश विश्वंभर ४७४ गुण म्हणजेच ९४.८०%,कु. आरती विनोद जाधव ९४.८०% सर्व प्रथम, तर सर्व द्वितीय कु. जाधव सारिका सदाशिव ९४% तर तृतीय क्रमांक कु. घोलप रेश्मा बाळकृष्ण ९३.४०% या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड या संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, संस्थेचे सचिव अतुल भाऊ पवार, मार्गदर्शक सुशील भाऊ पवार तसेच या शाळेचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री खंदारे एम.आर .प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री शिंदे डी.ए.सर, पर्यवेक्षक जवरे सर व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## 'एक राज्य, एक नोंदणी योजना रद्द करा'

**बीड (प्रतिनिधी):–** राज्य शासनाने प्रस्तावित केलेली एक राज्य, एक दस्त नोंदणी प्रणाली तात्काळ स्थगित करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाच्यावतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात महासंघाच्या शिष्टमंडळाने बीड येथे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर केले.

या निवेदनात, जमीन विकास, विक्री, तसेच पावर ऑफ अटर्नी व खरेदी–विक्री दस्त नोंदणी संदर्भातील प्रस्तावित प्रणालीमुळे मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार, न्यायालयीन व प्रशासकीय यंत्रणेवर ताण, आणि नागरिकांना अनावश्यक त्रास होण्याची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. नागरिक महिन्याला जमीन खरेदी–विक्री करत नसताना, केवळ नाविन्याच्या अखिल भारतीय मराठा महासंघाची मागणी नावाखाली शेतकरीविरोधी निर्णय राबवला जाऊ नये, अशी भूमिका महासंघाने मांडली. या निवेदनासाठी अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या आदेशानुसार मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले, जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके, उपाध्यक्ष प्रमेश्वर कवट, बापूसाहेब मराठे, उपाध्यक्ष शाम गायकवाड, प्रसिद्धी प्रमुख सुरेश गिराम, जिल्हा संघटक राहुल शिंदे, सरचिटणीस बंडू कोडगडे, शहराध्यक्ष दत्ता शेळके आदी उपस्थित होते. ही मागणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, पालकमंत्री, महसूल राज्यमंत्री यांच्यासह अप्पर मुख्य सचिव (महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग), नोंदणी महानिरीक्षक (महाराष्ट्र राज्य, पुणे) यांना ई–मेलद्वारे पाठवण्यात आली असल्याची माहिती महासंघाने दिली आहे.

## माजलगाव-तेलगाव रस्त्यावर अनेक ठिकाणी भेगा!

### पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती न केल्यास आंदोलन करण्याचा काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा इशारा

**माजलगाव (प्रतिनिधी):–** शहरातून गेलेला खामगाव–पंढरपूर हा पालखी महामार्ग वारकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या या रस्त्यावर माजलगाव ते तेलगाव दरम्यान अनेक ठिकाणी भेगा पडून रस्ता फाटला असल्याने आपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या महामार्गावरील रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन केली.



निवेदनात म्हटले आहे की, सदरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून रस्त्यावर मोठ्या भेगा पडल्यामुळे दुचाकीस्वारांना आपला जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे तर पावसाळ्यात या पडलेल्या भेगांमध्ये पाणी साचल्यास मोठ्या प्रमाणात अपघात होऊन निष्पाप नागरिकांना गंभीर दुखापत किंवा जीव देखील गमवावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पालखी महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव दरम्यानचा रस्ता पावसाळ्यापूर्वी डागडुजी करून वाहन चालकांना भयमुक्त प्रवास करण्यास मदत करावी व अपघात टाळण्याचे काम करावे. नसता लोकहिताचे या प्रश्नावर काँग्रेस पक्षाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी, दत्ता कांबळे. ॲड. इनामदार, विनोद सुरवसे, शेख जानुशा, शेख अहेमद, कृष्णा शिंदे, विठ्ठल कांबळे, बिभीषण साबळे, संदिप भरडकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी दिला.

## आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करुन जातीय रंग देणाऱ्यांवर कारवाई होणार जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचा इशारा

**बीड (प्रतिनिधी):–** सामाजीक सलोखा अबाधित राखण्याची जबाबदारी प्रशासनाबरोबरच जिल्ह्यातील नागरिकांचीही आहे. सोशल मीडियाचा वापर हा प्रत्येकाने जबाबदारीने करणे अपेक्षित आहे. आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करुन जातीय रंग देणाऱ्यांवर कठोर कारवाई कारवाई केली जाईल असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिला आहे.

याबाबत मंगळवारी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे, बीड जिल्ह्यात काही नागरिकांकडून आक्षेपार्ह व्हिडीओ किंवा फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले जात आहेत असे निदर्शनास आले आहे. आक्षेपार्ह व्हिडीओ किंवा फोटोची खात्री न करता काही समाजकंटकांकडून ते व्हायरल करुन त्याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्यामुळे बीड जिल्ह्यातील सामाजीक सलोख्याला तडा जात आहे. सोशल



मीडियावर पोस्ट होणाऱ्या आक्षेपार्ह पोस्टची प्रथम खात्री होणे आवश्यक आहे. अशा आक्षेपार्ह पोस्ट तात्काळ व्हायरल न करता त्याबाबत लगतच्या पोलीस ठाण्यात जाऊन नागरिकांनी त्या व्हायरल व्हिडीओ, फोटोची खात्री त्याची कायदेशीर सत्यता पडताळून कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे असे आवाहन एसपी काँवत यांनी केले आहे.

> बीड जिल्ह्यात सोशल जिल्ह्यातील मीडियावर व्हायरल होणाऱ्या आक्षेपार्ह व्हिडिओ फोटो, पोस्टवर सायबर पोलीस ठण्याकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. एखादी व्यक्ती अशा आक्षेपार्ह पोस्ट करतील किंवा तशा पोस्ट व्हायरल करतील अशा व्यक्तींविरुद्ध तसेच अशा आक्षेपार्ह व्हिडीओ किंवा फोटो व्हायरल करुन तसेच त्याची शहानिशा न करता त्याला जातीय रंग देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध अशा आक्षेपार्ह व्हिडिओ, फोटो किंवा पोस्ट व्हायरल करुन एखादा अनुचित प्रकार घडल्यास अशा व्यक्तीविरुद्ध गुन्हे दाखल करुन कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.
>
> **–नवनीत काँवत,**

## सुतार समाजातील गुणवंतांचा होणार गुणगौरव

### विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करून सहभागी व्हावे : बापूराव भालेकर

**बीड (प्रतिनिधी):–** बीड जिल्ह्यातील सुतार समाजातील दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बीड जिल्हा विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या वतीने २६ मे २०२५ रोजी विश्वकर्मा मंदिर तळेगाव, बीड येथे गुण गौरव करण्यात येणार असून, यासाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेसह नाव नोंदणी करून सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा सुतार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापूराव भालेकर यांनी केले आहे.

विश्वकर्मा सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. यासाठी समाजातील दानशूर व्यक्तीचा मोठा सहभाग मिळत आहे. विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या प्रयत्नाने प्रत्येक महिन्याच्या अमावस्याला प्रभू विश्वकर्मा पूजन व महाप्रसादाचे आयोजन केले जाते येत्या २६ मे २०२५ रोजी समाजातील उद्योगपती गंगाधरराव आगलावे यांच्या वतीने विश्वकर्मा पूजन व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. याच दिवशी समाजातील दहावी आणि बारावी परीक्षा २०२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. गुणानुक्रमे इयत्ता दहावी व बारावी मधील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना उद्योगपती समाजभूषण गंगाधरराव आगलावे

यांचे वतीने पारितोषिक देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक कै. राधाबाई दशरथ आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी २५०१ रु. बारावी २५०१ रुपये, द्वितीय पारितोषिक कै. दशरथराव कृष्णाजी आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी १५०१ रु. बारावी १५०१ रुपये, तृतीय पारितोषिक कै. किशोर गंगाधरराव आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी ११०१ रु. बारावी ११०१ रुपये, तसेच ७५% पेक्षा जास्त गुणवत्ताधारक इयत्ता दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मानपत्र देऊन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रम दि. २६ मे २०२५ रोजी प्रभू विश्वकर्मा मंदिर, नगर रोड तळेगाव बीड. या ठिकाणी होणार आहे. बीड जिल्ह्यातील तमाम सुतार समाज बांधवांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या मुलांच्या कौतुक सोहळ्यासाठी आपल्या मुलांचे गुणपत्रिका २४ मे २०२५ पर्यंत अरुण कुंडलकर–९४२२७२०८९७, पंढरीनाथ ८२०८४९५८६७, क्षीरसागर पांडुरंग उनवणेसर –७५८८०५६१९, राजु पांचाळ – ९७६५७६१४३६ यांच्याशी संपर्क करून गुणपत्रिकेसह नाव नोंदणी करावी असे आवाहन बीड जिल्हा सुतार समाज संघटनेचे

# दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीनेच प्रसिद्ध आहे- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड (सरकार): बीड जिल्हा कलाकारांची भूमी असून या जिल्ह्यात अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्यातून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवलेला आहे काही दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने देखील प्रसिद्ध आहे. कचरवाडी सारख्या डोंगर कुशीत जन्मलेल्या एका तरुणाने चित्रपट क्षेत्रात भरभरून यश मिळवले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड जिल्ह्यातील कचरवाडी येथील रहिवासी असलेल्या डॉ.महेशकुमार वनवे यांच्या वामा लढाई सन्मानाची या चित्रपटाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते तनिष्का चित्रपटगृहात करण्यात आले. यावेळी आ.विजयराजे पंडित, माजी आ.बदामराव पंडित, अॅड.उषाताई दराडे, सुभाष सारडा, अनिल जगताप, विनोद मुळूक, ज्योतीताई मेटे, अरुण डाके, विलास बडगे, सुधाकर मिसाळ, नितीन धांडे, संगीता धसे, नवनाथ शिराळे, अभय कोटेचा, गौतम खटोड, शुभम धूत, सुहास पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर वनवे आणि लोकाशा च्या वतीने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकाशाचे संपादक विजय बंब यांनी केले तर डॉ.महेशकुमार वनवे यांनी मनोगत व्यक्त करताना आतापर्यंत भोजपुरी सिनेमात काम केले पण मराठी चित्रपट म्हणून आज प्रथमच पदार्पण करत आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खूप मोठे सहकार्य मला लाभले असून मी मुंबईत गेलो तेव्हा तिथे अण्णांनीच मला



आधार दिला माझ्या या यशाच्या मागे माझ्या घरातून पाठबळ असून यापुढे मराठी चित्रपट निर्मितीवर आपला भर असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, शुक्रवारी वामा लढाई सन्मानाची हा चित्रपट रिलीज झाला आहे राज्यात एकाच वेळी शेकडो थिएटर मधून हा चित्रपट रिलीज होतोय ही लोकांच्या शुभेच्छांची मोहर आहे. महेश वनवे यांनी जेव्हा मुंबईत प्रवेश केला तेव्हाच मी म्हणालो होतो काळजी करू नकोस, कचरवाडीच्या डोंगर रांगेच्या कुशीत जन्मलेल्या महेश याने कॅलिफोर्निया पर्यंत मजल मारली आहे. भोजपुरी लोकांचा पसंतीचा हिरो म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते दुर्दैवाने माणुसकीला काळीमा लागेल अशा घटना घडत आहेत पण बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने कितीतरी पटीने पुढे आहे. विजय बंब सारखे पडद्यामागचे कलाकार पाठीशी आहेत बीड जिल्हा विविधतेने नटलेला जिल्हा आहे, स्त्री-पुरुष हा भेद आता राहिला नाही वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा याप्रमाणे पंढरीच्या विठ्ठलाने देखील स्वतः आपल्या बाजूला रखुमाईला उभे केले आहे. म्हणजेच भक्ती आणि शक्ती सोबत घेऊनच त्यांनी भक्तांचा सागर आपल्याकडे वळवला आहे. स्त्री शक्तीचा अनुभव म्हणून सुनीता विल्यम सारखी भारतीय वंशाची अंतराळवीर नऊ दिवसासांठी अंतराळ स्थानकावर गेली होती परंतु नऊ महिने संघर्ष करून तिने पृथ्वीवर प्रवेश केला यावरूनच स्त्रीशक्तीचा अंदाज आपण लक्षात घ्यायला हवा. या चित्रपटाचे कथानक स्त्री शक्तीवर अवलंबून असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान त्यांनी केले. यावेळी चित्रपट रिलीज झाल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी देखील अर्धा तास चित्रपटाचे परीक्षण केले.

## गावातून घर उठवून लावण्याची धमकी देत वीटा व काठ्यांनी मारहाण

### पाच जणांविरुद्ध अॅट्रॉसिटीसह मारहाणीचा गुन्हा

परळी (सरकार)गैरकायद्याची मंडळी जमवून मोटारसायकलला कट का मारला या कारणावरुन नागापुर कॅम्प येथे एका तरुणावर हल्ला करीत जातीवाचक शिवीगाळ केली तसेच वीटा व काठ्यांनी मारहाण केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध अॅट्रॉसिटीसह मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत परळी ग्रामीण पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, यातील फिर्यादी रोहीत उमाकांत बनसोडे वय २० रा. नागापुर कॅम्प ता. परळी वै. यास त्याच गावातील आरोपी १) धनराज बंडु सोळके, २) राम सुंदर सोळके, ३) कृष्णा सोळंके, ४) सुनिल सोळंके, ५) उध्दव सोळंके यांनी नागनाथ मंदिर समोर मोटार सायकलला कट मारण्याच्या कारणावरुन फिर्यादी व साक्षीदार यांना जातीवाचक शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी, वीटांनी व काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच फिर्यादी व साक्षीदारांना गावातून उठवुन लावण्याचीधमकी दिली. अशा अशयाच्या फिर्यादीवरून पाच आरोपीं विरुद्ध गुरनं २२७/२०२५ कलम ११८(१),११५(७). ३५२. ३५१(२), ३५१(३),१८९(२),१९०,१९१(२) BNS सह कलम ३(१)(r), ३(१)(s),३(२)(va) अजाज अप्र कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई चेतना तिडके या करीत आहेत.

## ना.पंकजाताई मुंडेंचा एक फोन अन् भुसावळला बदली झालेले कर्मचारी परत परळीला रूजू

### थर्मलमधील 'त्या' कर्मचाऱ्यांनी मानले ना.पंकजाताईंचे आभार!

परळी (सरकार): राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या एका फोनमुळे काही दिवसापूर्वी परळी औष्णिक वीज केंद्रातून भुसावळ येथे बदली झालेल्या तंत्रज्ञ पदावरील कर्मचारी पुन्हा परळी येथे रूजू झाले आहेत. बदली रद्द झाल्याने आनंदित झालेल्या या कर्मचाऱ्यांनी ना. पंकजाताईंची मुंबईत प्रत्यक्ष भेट घेऊन आभार मानले आहेत.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील तंत्रज्ञ २ व तंत्रज्ञ ३ या पदावर कार्यरत असणाऱ्या काही कर्मचाऱ्यांच्या काही दिवसापूर्वी भुसावळ येथे बदल्या झाल्या होत्या. कुटुंबापासून दूर ठिकाणी बदल्या झाल्याने कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय वेगवेगळ्या कौटुंबिक अडचणीमुळे परेशान झाले होते. बदली रद्द व्हावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले पण यश न आल्याने



अखेर त्यांना भुसावळ येथे जॉईन व्हावे लागले होते. हया सर्व कर्मचाऱ्यांनी मध्यंतरी ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन आम्हाला पुन्हा परळीत आणावे अशी विनंती केली होती. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाच्या कौटुंबिक अडचणीची दखल घेऊन वीज निर्मिती कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एक फोन केला आणि सर्वांच्या पुन्हा भुसावळ येथून परळी औष्णिक वीज केंद्रात बदल्या झाल्या.भुसावळ येथून परत परळीला बदली झाल्याने तंत्रज्ञ २ चे कर्मचारी अविनाश पवार, संतोष ठोकळ, संतोष मुंडे तसेच तंत्रज्ञ ३ चे परमेश्वर बीडगर, गोविंद शेप, संपत बळवंत, गजानन गिते, मंचक फड, शिवाजी बीडगर, गोरखनाथ खाटिक, नागनाथ मुंडे, कृष्णा मुंडे, मदन फड, अरूण फड यानी ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

## वडमाऊली दहिफळ येथे मोफत मुलांचे बाल संस्कार शिबिर

बीड (सरकार)केज तालुक्यातील दहिफळ माऊली येथे शिवप्रतिष्ठान वारकरी शिक्षण संस्थाचे संचालक ह.भ प बसवर महाराज यांच्या मार्गदर्शनाने व कुशल नियोजनाने दिनांक २ जून पर्यंत मुलांचे भव्य दिव्य बालसंस्कार शिबिर सुरू होणार आहे.

हे शिबिर सर्वांसाठी मोफत आहे या शिबिरात मुलांना वारकरी भजन,किर्तन, भा. ज्ञानेश्वरी प्रवचन, भागवत कथा,रामायण, तुकाराम गाथा भजन, हरिपाठ, तबला वादन,गायन, हार्मोनियम वादन तसेच मूल्य शिक्षण योग याबरोबरच संगीत आणि विविध कलात्मक गोष्टी शिकवण्यात येणार आहेत.या शिबिरामध्ये मुलांना नाश्ता , दोन वेळा जेवण, फिल्टरचे पिण्याचे पाणी असणार आहे. तरी जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुला मुलींना प्रवेश देऊन या शिबिराचा लाभ घ्यावा असे शिवप्रतिष्ठांची हभप बसवर महाराज यांनी कळवले आहे.

## शेतकऱ्यांची खते व बियाणासाठी लिंकिंगद्वारे होणारी लूट तात्काळ थांबवा-उल्हास गिराम

बीड (सरकार):ऐन खरीपाच्या तोंडावर बीड जिल्ह्यात डीएपी खत व सोयाबीन, कपाशीच्या बियाणांची शेतकऱ्या कडून मागणी वाढताच खात व बियाणे बाजारातून गायब झाले असून यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे. ऐन पेरणी हंगामात शेतकऱ्यांना वेठीस धरल्यास त्यांना त्यांची जागा दाखवून देऊ असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हंटले आहे.



एकीकडे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार जिल्ह्यात मुबलक प्रमाणात खते व बियाणे उपलब्ध असल्याचे सांगतात, मग मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना ते शेतकऱ्यांना का मिळत नाही ? बीड जिल्ह्यात खरीप पेरणी जवळ आली असतानाच डीएपी खताची आवक कमी झाल्याचे सांगत शेतकऱ्यांना डीएपी खतासोबत व कपाशीच्या काही नामांकित बियाणेवर इतर गरज नसलेल्या खताची व बियाणे ची लिंकिंग केल्या जात आहे. यामुळे आधीच नापिकी आणि अवकाळी ने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना जास्तीचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

या बाबतीत शासनाचा कृषी विभाग अजूनही झोपेत असून कृषी विभागाचे भरारी पथक काय करत आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कृषी विभागाच्या साह्याने काही कृषी सेवा केंद्र कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने विक्री करून शेतकऱ्यांना लुटण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे, पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हे होऊ देणार नसुन, कृषी विभागाने यावर तात्काळ कागदी घोडे न नाचवता उपाययोजना करावी व शेतकऱ्यांची लिंकिंग द्वारे होणारी लूट थांबवावी, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करू असा इशारा जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

## शेतरस्त्याची नोंद ७/१२ वर होणार

शिरूर (सरकार): शेती करतांनाच्या प्रमुख समस्या पैकि शेतरस्ता नसणे हि गंभीर समस्या मुळे राज्यभरातील शेतकरी त्रस्त असल्याच्या तक्रारी त्यामुधून वाद-विवाद,होऊन शेतक-यांमधील संघर्ष विकोपाला जात असल्याने मह.शासनाने दि.२२ में रोजी महसुल विभागाच्या वतीने शा.नि.क्र-: जमीन २०२५ /प्र.क.४७/ज.१अ नुसार प्रत्येक नेता साठी बांधावरून किमान ३ ते ४ मिटर रुंदीचा रस्ता अनिवार्य असणार आहे.

या संबंधातील मागणी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अनेक वर्षापासुन शासन स्तरांवर लावून धरली होती. यामध्ये प्रचलित,वहीवाटीत असणारे पायवाट,गाडीवाट,वस्ती रस्ते सद्यस्थितीत वापरात आहेत परंतू त्याची नोंद महसुली अभिलेख व भूमी अभिलेख मधील गाव नकाशात नोंद नसल्याने शेतक-यांमधील संघर्ष विकोपाला गेल्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत.या शासन निर्णयामुळे शेतरस्त्याची अडवणूकीतून सामंजस्याने मार्ग काढून अथवा वेळ प्रसंगी महाराष्ट जमीन महसुल संहिता १९६६ चे कलम १४३ व मामलेदार कोर्ट १९०६ चे कलम (५) नुसार शेतक-यांचा जमीन कसण्यासाठी शेतरस्ता मिळणे हक्क आसल्याने या प्रमाणे सक्षम प्राधिकृत अधिकारी यांनी या संबंधी तक्रारीची दखल घेऊन तुंबलेल्या शेत रस्ते,अतिक्रमित शेत रस्ते खुले करून अथवा बांधावरून सामंजस्याने किमान ३ ते ४ मिटर रस्ते निर्माण त्यांची नोंद ७/१२ च्या इतर हक्कात करण्याचा शेतकरी हिताचा निर्णय आहे.यामुळे शेतीमधील बियाणे,खते ,औजारे,तसेच आधुनिक साधने जसे कि ट्रॅक्टर,विविध यंत्र मशिनरी अत्याधुनिक साधनांच्या वापरातील अडथळे दुर होऊन शेतक-यांना वहिवाटीस सुलभता येणार आसल्याने शिवश्री कृषिमंडळाच्या अनेक वर्षांच्या मागणीला काही अंशी यश प्राप्त झाले आहे.यामुळे शिवराम राऊत व पिडीत शेतकरी वर्गाकडून शासनाचे आभार व्यक्त केले जात आहेत.

## अमृतच्या रांगोळी व निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड (सरकार): महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), बीड व दीनदयाल शोध संस्थान जनशिक्षण संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रांगोळी व निबंध स्पर्धेला युवक-युवतींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



ही स्पर्धा २२ मे २०२५ रोजी पांगरी रोडवरील जनशिक्षण संस्थानच्या आवारात पार पडली. या स्पर्धेत फक्त अमृतच्या लक्षित गटातील १२ ते ३० वयोगटातील युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. अमृतच्या उद्दिष्टानुसार, ज्या समाज घटकांना कोणत्याही महामंडळाचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा संधीचं दार ठरली.

रांगोळी स्पर्धेत १२ ते २१ वयोगटासाठी 'मेक इन इंडिया' आणि २१ ते ३० वयोगटासाठी 'माझी वसुंधरा' हे विषय होते. निबंध स्पर्धेत अनुक्रमे 'डॉ. आनंदी गोपाळ जोशी' आणि 'भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे' या विषयांवर विचार मांडण्याची संधी मिळाली. सहभागी स्पर्धकांनी उत्कृष्ट कला आणि लेखनकौशल्य दाखवले. प्रत्येक गटासाठी प्रथम क्रमांक २०००, द्वितीय १५००, आणि तृतीय क्रमांक १००० अशी आकर्षक रोख पारितोषिके निश्चित करण्यात आली आहेत. स्वा.सावरकर जयंतीदिनी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव व बक्षीस वितरण होणार आहे. या उपक्रमाला डॉ. (सौ.) सीमाताई जोशी व सुनंदाताई कुलकर्णी यांनी विशेष भेट देऊन प्रोत्साहन दिले. या यशस्वी आयोजनात जनशिक्षण संस्थानचे मा. संचालक श्री. गंगाधर देशमुख, अमृतचे जिल्हा व्यवस्थापक श्री. विशाल जोशी, सौ. सुमेधा मनसबदार, श्री. दिगंबर जोशी, श्री. सुमित धिरडे, जनशिक्षण संस्थानचे सर्व कार्यकर्ते यांचे विशेष योगदान लाभले.

## शिवसंग्रामचा ३० हजार सदस्य नोंदणीचा टप्पा पूर्ण

बीड (सरकार): राज्यभर शिवसंग्राम सदस्य नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. जिल्ह्यात देखील अभियानाला उत्तम प्रतिसाद मिळत असून शिवसंग्राम ५० हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यापैकी ३० हजार सदस्य नोंदणी पूर्ण झाली असून येणाऱ्या येणाऱ्या काळात हे उद्दिष्ट आपण पूर्ण करू आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला पूर्ण ताकदीनिशी सामोरे जाऊ असे प्रतिपादन वांगी येथील सदस्य नोंदणी अभियाना दरम्यान शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केले.

१ मे पासून शिवसंग्रामच्यावतीने राज्यभरात सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. याला बीडमध्ये देखील उत्तम प्रतिसाद मिळत आहे. विविध तालुके आणि सर्कल मध्ये सदस्य नोंदणी आता जोर धरू लागली असून शिवसंग्रामने ठेवलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कार्यकर्ते पदाधिकारी जोमाने कामाला लागले आहेत. यातच लिंबागणेश सर्कलचे सदस्य नोंदणी



अभियान हे लिंबागणेश येथे पार पडले तर वांगी येथे देखील सदस्य नोंदणी अभियान पार पडले याअभियानास डॉ.ज्योती मेटे उपस्थित राहून सदस्य नोंदणी चा उत्साह वाढवला आणि लोकनेते विनायकराव मेटे यांनी मागील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये शिवसंग्राम चा झेंडा जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये फडकवला होता. आता साहेबांच्या पश्चात आपल्या सर्वांची जबाबदारी आहे की आपण सर्वांनी मिळून शिवसंग्रामचा झेंडा पुन्हा एकदा जिल्हापरिषद, पंचायत समितीवर फडकवायचा आहे. त्याचबरोबर आपले सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करून आता निवडणुकीच्या तयारीला लागा असे देखील सुतोवाच त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा.सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे पाटील , जिल्हाउपाध्यक्ष सचिन कोटुळे, पंडितराव माने,सचिन काळकुटे, बाळासाहेब हावळे, ज्ञानेश्वर कोकाटे,बीड तालुका उपाध्यक्ष दिनकर शेळके, बीड तालुका सचिव सिताराम घुमरे, नाळवंडी सर्कल प्रमुख नागोराव बोरगे, शिवणीचे सरपंच विजय सुपेकर, नामदेव शेळके, अर्जुनराव शेळके, हरिभाऊ शेळके, बाळासाहेब गोडसे, लक्ष्मण कोलगुडे, गोपीनाथ कोलगुडे ,रावण शेलार ,रामनाथ शेळके, बाबुराव जाधव, नारायण बाजगुडे, ब्रह्मदेव शेळके सर,संजय मारूती घोलप, हरिभाऊ भोसले सर्कल प्रमुख, चर्हाटा गण प्रमुख प्रकाश दहे, शाहू मुळीक,अबा येळवे, विष्णू कळसले, मच्छिंद्र माने, मंगेश माने, दादा गोंदावले, सुखदेव वाणी,शेख खाजा भाई,बापु सवासे,सुनिल डोंगर,केशव टाके,जिवण मुळे,बाबु भिसे यांच्यासह नाळवंडी आणि लिंबागणेश सर्कल मधील गट व गणातील शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)